मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र.१ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

**ठराव क्र.१. :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला मा. नगरसेवक यांनी सलग मिटिंगला गैरहजर राहिल्यास त्यांच्या बद्दल एखाद्याने वरिष्ठ कार्यालयास तक्रार केल्यास त्यांचे नगरसेवक पद रद्द होऊ शकते.त्यासाठी एखादा नगरसेवक अथवा नगरसेविका यांना दीर्घकाळ रजेवर रहावयाचे असल्यास त्यांनी मा. मुख्याधिकारी यांच्या कडे रजेचा अर्ज देवून तो मंजूर करून घेऊन रजेवर जाता येते याबद्दल ची माहिती मा.मुख्याधिकारी यांनी सभागृहात दिली.

ज्या नगरसेवकांना दीर्घकाळ सुट्टीवर जायचे असेल त्यांनी अर्ज देऊनच सुट्टीवर जावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- ज्योती गोविंद टिळेकर
अनुमोदक :- पूनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.२ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे

ठराव क्र.२ :- सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनिमय करण्यात आला. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सुचक :- योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील रस्ते, ड्रेनेज व स्ट्रीट लाईट दुरुस्ती बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र.३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील नगरपंचायत मालकीचे जे रस्ते आहेत ते ग्रामपंचायत असताना बनविण्यात आलेले असुन ते खूपच खराब झालेले आहेत काही डांबरी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत.सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यांना तडे गेलेले असुन खड्डेही पडलेले आहेत.काही पेव्हिंग ब्लॉक चे रस्ते आहेत त्यांचे पेव्हिंग फुटून रस्तावर खड्डे पडलेले आहेत. तसेच जे ड्रेनेज बनविण्यात आलेले होते त्यांची तुट फुट झालेली असुन काही चेंबरखराब झालेले आहेत त्यामुळे डेनेज चोकअप होत आहेत.गावात बसविण्यात आलेले स्ट्रीट लाईट मोठ्या प्रमाणावर बंद पडलेल्या आहेत त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अंधाराचे साम्राज्य आहे. अंधारामुळे एखादा अपघात होण्याची शक्यता आहे.तेव्हा वरील सर्व रस्ते,ड्रेनेज,स्ट्रीट लाईट यांचा प्रभागानुसार सर्व्हे करून किती रस्ते, ड्रेनेज ,व लाईट खराब व नादुरुस्त आहेत त्यांचा सर्व्हे करण्यात यावा अशा स्वरुपाची सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ प्रियंका अभिजित मोरे
अनुमोदक :- सौ पूनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.४ :- देहू नगरपंचायत हद्दीत नवीन पाण्याची लाईन टाकणे बाबत विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.४ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून देहू शहरात पाणी पुरवठा पाईप लाईनचे काम करण्यात आलेले असुन योजना झाल्यानंतर देहू शहरात काही नविन सोसायट्या झालेल्या आहेत.त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची काहीच सोय नाही ज्या सोसायट्यांमध्ये बोरवेल होत्या उन्हाळ्यामुळे त्यांचे पाणी गेल्यामुळेलोकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. तेव्हा अशा सोसायट्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात यावी अशा स्वरुपाची चर्चा करण्यात आली.

सद्यस्थिती नविन लाईन टाकणे कामी खूप खर्च येणार आहे. तेवढा निधी देहू नगरपंचायत कडे उपलब्ध नाही तेव्हा नविन लाईन न टाकता आहे या जुन्या लाईनलाच कनेक्शन देण्यात यावे असे मत मुख्याधिकारी साहेबांनी मांडले.

वडाचा माळ संपूर्ण परिसर शिवनगरी,गंधर्वविहार,व्यंकट सोसायटी,सनराईज प्रोपटी,अभंग सोसायटी,व इतर अनेक सोसायटी,याठिकाणी पाण्याची लाईनच नाही पाण्याची खूपच भीषण परिस्थिती आहे. टँकर ने पाणी पुरवठा करता येऊ शकतो ? त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची पाण्याची सोय नाही एखादा टँकर भाडेतत्वावर घेऊन पाणी देण्यात यावे.पंपिग हाउस बोडकेवाडी येथुन घेऊन वाटप करण्यात यावे.

तसेच इतरही काही प्रभागातील सोसायट्यांमध्ये लाईन टाकली नसल्यामुळे पाण्याची परिस्थिती खूपच बिकट आहे. अशा सर्व सोसायट्यांचा सर्व्हे करण्यात यावा. व त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकरने पाणी पुरवठा करण्यात यावा. गावातील जे टँकर मालक आहेत त्यांच्याशी चर्चा करण्यात यावी व कमीत कमी दरात टँकर भाडेतत्वावर घेण्यात यावा . जर टँकर मालक नुसता टँकर भाडेतत्वावर देत असतील तर बोडकेवाडी पंपिंग स्टेशन येथुन पाणी भरण्यात यावे व त्यांचे योग्य ते नियोजन करून ज्या ठिकाणी पाणी नाही त्या सर्व सोसायट्यांमध्ये वाटप करण्यात यावे .ज्या सोसायट्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय आहे तेथे टँकर पाठवु नये. अशा स्वरुपाची सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.मिना राहुल कुऱ्हाडे

अनुमोदक :- श्री. सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.४ :- देहू नगरपंचायत हद्दीत नवीन पाण्याची लाईन टाकणे बाबत विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.४ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून देहू शहरात पाणी पुरवठा पाईप लाईनचे काम करण्यात आलेले असुन योजना झाल्यानंतर देहू शहरात काही नविन सोसायट्या झालेल्या आहेत.त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची काहीच सोय नाही ज्या सोसायट्यांमध्ये बोरवेल होत्या उन्हाळ्यामुळे त्यांचे पाणी गेल्यामुळेलोकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. तेव्हा अशा सोसायट्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात यावी अशा स्वरुपाची चर्चा करण्यात आली.

सद्यस्थिती नविन लाईन टाकणे कामी खूप खर्च येणार आहे. तेवढा निधी देहू नगरपंचायत कडे उपलब्ध नाही तेव्हा नविन लाईन न टाकता आहे या जुन्या लाईनलाच कनेक्शन देण्यात यावे असे मत मुख्याधिकारी साहेबांनी मांडले.

बडाचा माळ संपूर्ण परिसर शिवनगरी,गंधर्वविहार,व्यंकट सोसायटी,सनराईज प्रोपटी,अभंग सोसायटी,व इतर अनेक सोसायटी,याठिकाणी पाण्याची लाईनच नाही पाण्याची खूपच भीषण परिस्थिती आहे. टँकर ने पाणी पुरवठा करता येऊ शकतो ? त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची पाण्याची सोय नाही एखादा टँकर भाडेतत्वावर घेऊन पाणी देण्यात यावे.पंपिग हाउस बोडकेवाडी येथुन घेऊन वाटप करण्यात यावे.

तसेच इतरही काही प्रभागातील सोसायट्यांमध्ये लाईन टाकली नसल्यामुळे पाण्याची परिस्थिती खूपच बिकट आहे. अशा सर्व सोसायट्यांचा सर्व्हे करण्यात यावा. व त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकरने पाणी पुरवठा करण्यात यावा. गावातील जे टँकर मालक आहेत त्यांच्याशी चर्चा करण्यात यावी व कमीत कमी दरात टँकर भाडेतत्वावर घेण्यात यावा . जर टँकर मालक नुसता टँकर भाडेतत्वावर देत असतील तर बोडकेवाडी पंपिंग स्टेशन येथुन पाणी भरण्यात यावे व त्यांचे योग्य ते नियोजन करून ज्या ठिकाणी पाणी नाही त्या सर्व सोसायट्यांमध्ये वाटप करण्यात यावे .ज्या सोसायट्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय आहे तेथे टँकर पाठवु नये. अशा स्वरुपाची सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.मिना राहुल कुऱ्हाडे
अनुमोदक :- श्री. सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र ५ :- प्रभाग निहाय लाईटचे नविन खांब खरेदी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र ५:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक देव दर्शनासाठी येत असतात.तसेच हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथे जागा घेऊन घरे बांधणाऱ्याचे प्रमाण खुपच असून नवनविन सोसायटया निर्माण झालेल्या आहे . अशा सर्व सोसायट्यांमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून लाईट असणे खुपच गरजेचे आहे . तेव्हा सर्व प्रभागांचा सर्व्हे करून कोणत्या प्रभागात किती लाईटच्या पोलची आवश्यकता आहे याची सविस्तर पाहणी करून अहवाल तयार करण्यात यावा व त्यानुसार नविन लाईटचे खांब खरेदी करण्यात यावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे.

सुचक :- योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- आदित्य चिंतामण टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र ६ :- प्रभाग क्र. ६ मध्ये HT/LT विद्युत वाहिनी भूमिगत करणेबाबत.

ठराव क्र.६:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.६ मध्ये विद्युत वाहिनी ह्या ( ओपन ) वरच्या बाजुने आहेत त्यामुळे दोन ते तीन वेळा शॉक लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. तेव्हा त्या विद्युत वाहिनी ध्या भूमिगत करणे गरजेच आहे . प्रभाग क्र.६ प्रमाणेच सर्व प्रभागाचा सर्व्हे करण्यात यावा. व प्रभागातील कोणत्या सोसायट्या मधील विद्युत वाहिनी भुमिगत करणे गरजेचे आहे त्यांचा सविस्तर याना अहवाल तयार करण्यात यावा. विद्युत वाहिनी भुमिगत करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातुन किवा विकास शुल्क निधी अथवा न.प. फंड अथवा डी.पी.डी.सी.मधून करणे बाबत मागणी करण्यात यावी. अशा स्वरूपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला

सुचक :- सौ. पूनम विशाल काळोखे
अनुमोदक :- सौ.पूजा सुमित काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. ७ :-** देहू ग्रामपंचायत व प्रशासक काळातील थकीत बिले अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र.७ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ग्रामपंचायतचे ०८/१२/२०२० रोजी देहू नगरपंचायत मध्ये रुपांतरण झाल्यामुळे ग्रामपंचायत काळातील थकीत विकासकामांची बिले व इतर बिले अदा करणेसाठी विकासकामे टेंडर फाईल, MB, मुल्यांकन फाईल या सर्व बाबीची शहानिशा करूनच किरकोळ व टेकेदारांची बिले अदा करण्यात यावी. तसेच त्यानंतर प्रशासक काळात वाढत्या कोरोना प्रादुर्भावामुळे अत्यावश्यक सेवा म्हणून काही कामे करण्यात आली त्या कामांबाबत आवश्यक कागदपत्रांची शहानिशा करूनच त्यांची बिले अदा करण्यात यावी. अशा स्वरूपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ग्रामपंचायत काळातील थकीत विकासकामांची बिलांची यादी**

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव | रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १ | मौजे देहू येथील विठ्ठलवाडी कंद पाटील ६ रस्ता करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | १२६४६०.०० |
| २ | मौजे देहू माळीनगर शाळा परिसर सुधारणा करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २४५००.०० |
| ३ | मौजे देहू येथील वैकुंठ स्मशानभूमी सुधारणा उर्वरित काम करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ४ | मौजे देहू येथील कचरा डेपो येथे सुधारणा करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ५ | मौजे देहू वार्ड क्र.४ व ५ अंतर्गत रस्ते करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ६ | संत तुकाराम मंगल कार्यालय ते शिवाजी मोरे घर उर्वरित रस्ता करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ७ | मौजे देहू येथे वार्ड क्र.१ अंतर्गत रस्ते तयार करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ८ | मौजे देहू विठ्ठलवाडी अंतर्गत अंगणवाडी केंद्र क्र.१,२,३ दुरुस्ती करणे | शशिकांत गेनूभाऊ मगर | २९९०००.०० |
| ९ | मौजे देहू येथे वार्ड क्र.१,२, ३ चेंबर दुरुस्ती करणे | सुधीर द कवडे | १४४५००.०० |
| १० | मौजे देहू येथे वार्ड क्र.४, ५ ६ चेंबर दुरुस्ती करणे | सुधीर द कवडे | १४४५००.०० |
| ११ | मौजे देहू येथील अंगणवाडी क्र.४ महालक्ष्मीनगर उर्वरित इमारत बांधणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | १८५०००.०० |
| १२ | मौजे देहू येथील अंगणवाडी क्र. २ उर्वरित इमारत बांधणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | १८५०००.०० |
| १३ | मौजे देहू चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.१ रस्ता करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | ३५०००.०० |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | मौजे देहू चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.२ रस्ता करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | ३५०००.०० |
| १५ | मौजे देहू येथील चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.३ रस्ता करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | २६२०४०.०० |
| १६ | मौजे देहू येथील चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.४ रस्ता करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | २६२०४०.०० |
| १७ | मौजे देहू चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.१ भूमिगत गटर करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | ५६०००.०० |
| १८ | मौजे देहू चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.३ भूमिगत गटर करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | ५६०००.०० |
| १९ | मौजे देहू चव्हाणनगर भाग २ गल्ली क्र.४ भूमिगत गटर करणे | श्री. सोनेश्वर मजूर सहकारी संस्था मर्यादित | ३५६००.०० |
| २० | मौजे देहू येथील देहू गावठाण व माळवाडी शाळा दुरुस्ती करणे १४ वा वित्त आयोग | श्री अमित शिवाजी घुले | ४१६०००.०० |
| २१ | मौजे देहू येथील अंगणवाडी क्र. २ इमारत बांधणे | श्री अमित शिवाजी घुले | १८५०००.०० |
| २२ | मौजे देहू चव्हाणनगर येथे चावडी इमारत बांधणे | श्री अमित शिवाजी घुले | ७३३०००.०० |
| २३ | मौजे देहू येथील जि.प.प्राथमिक शाळा देहू, माळीनगर व बोडकेवाडी दुरुस्ती करणे १४ वा वित्त आयोग | चेअरमन जय मजूर सहकारी संस्था मर्यादित | १७४५००.०० |
| २४ | मौजे देहू येथील अंगणवाडी क्र.४ महालक्ष्मीनगर अंगणवाडी इमारत बांधणे | चेअरमन जय मजूर सहकारी संस्था मर्यादित | ८५०००.०० |
| २५ | मौजे देहू येथे जि.प. शाळा परिसर सुधारणा करणे १४ वा वित्त आयोग | चेअरमन कृष्णाई मजूर सहकारी संस्था मर्यादित | २३४०००.०० |
| २६ | मौजे देहू येथे वार्ड क्र. १ ते ६ अंतर्गत भूमिगत गटर करणे | चेअरमन कृष्णाई मजूर सहकारी संस्था मर्यादित | १७१५००.०० |
| २७ | मौजे देहू येथील अंगणवाडी केंद्र क्र.३ दुरुस्ती करणे | शिवांश असोसिएट्स | ४९०००.०० |
| २८ | मौजे देहू येथील अंगणवाडी केंद्र विठ्ठलवाडी क्र.२ दुरुस्ती करणे | शिवांश असोसिएट्स | ४९०००.०० |
| २९ | मौजे देहू येथील अंगणवाडी विठ्ठलवाडी केंद्र क्र.१ दुरुस्ती करणे | शिवांश असोसिएट्स | ४९०००.०० |
| | | | ५४९१६४०.०० |

सुचक :- सौ.रसिका स्वप्निल काळोखे
अनुमोदक :- सौ.पूनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. ८ :-** माझी वसुंदरा अंतर्गत विठ्ठलनगर प्राथमिक शाळेसमोर असणारी विहीर नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत पुनः जीवित करणेबाबत.

**ठराव क्र.८ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. योगेश परंडवाल यांनी सुचविल्या प्रमाणे परंडवाल आळी येथील व विठ्ठलवाडी जि.प.शाळे समोरील सार्वजनिक विहीर पुनःजीवित करणेबाबत चर्चा झाली. तसेच शहरातील अश्याप्रकारच्या इतरही विहिरींचा स्त्रोत पुनः जीवित करणेबाबत सर्वांनी सहमती दर्शविले आहे. त्याअनुषंगाने सपना मोरे यांनी सुचविल्या प्रमाणे बाजार आळी सुंदरगल्ली येथील बोअरची पाणी पातळी वदविण्यात यावी. सर्व ठिकाणच्या जागामालकाची परवानगी घेऊन सर्व्हे पूर्ण करण्यात यावे. अशा स्वरूपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री. प्रवीण रामदास काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. ९ :- माळीनगर येथील अनगडशहाबाबा यांच्या दर्ग्या समोर विहिरीवर झाकण टाकणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. अनगडशहाबाबा दर्गा येथे आषाढी वारी पालखी सोहळयाची पहिली आरती तेथे असते त्यासाठी हजरो भाविकांची तेथे गर्दी असते. अनगडशहाबाबा यांच्या दर्ग्या समोर विहिरीवर झाकण नसल्याने अपघात होण्याची शक्यता टाळता येणार नाही. तरी विहिरीवरचा अपघात टाळण्यासाठी जाळी बसविण्यात यावी अशा स्वरूपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला

सुचक :- सौ. पोर्णिमा विशाल परदेशी
अनुमोदक :-सौ. सपना जयेश मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. १०:-** चव्हाण नगर मधील चावडीचे अपूर्ण काम करणे तसेच पुढील भागात ब्लॉक बसविणेबाबत विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.१० :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. समाज मंदिर, चव्हाण नगर मधील चावडी मधील सर्व कामे अपूर्ण असल्याने येथील रहिवासी यांनी कामे पूर्ण करण्यासाठी सुचविल्या प्रमाणे समाजमंदिर चावडी दलितवस्ती फंडातून किवां अगोदर जो फंड मिळेल त्यातून कामे पूर्ण करण्यात यावीत. अश्या स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला

सुचक :- सौ.मीना राहुल कुऱ्हाडे
अनुमोदक :- सौ. पूजा अमोल दिवटे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. १२:-** देहू नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी मधील महालक्ष्मी मंदिर सुशोभिकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.१२ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला देहू नगरपंचायत हद्दीतील सुतार गल्ली येथील महालक्ष्मी मंदिर हे खुप जुने मंदिर असुन येथे स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात मंदिर जुने असल्यामुळे त्याची थोडीफार डागडुगी व समोर असणारा रिकामा परिसर सुशोभिकरण केल्यास येणारे भाविक त्या ठिकाणी बसु शकतील. परंतु सदरची जागा व मंदिर खाजगी मालकाचे असल्याने सदरची जागा व मंदिर हे नगरपंचायतीच्या ताब्यात दिल्यास सदरच्या ठिकाणी सुशोभिकरणाचे काम करण्यात यावे अशा स्वरूपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.प्रियंका अभिजित मोरे
अनुमोदक :- सौ.पोर्णिमा विशाल परदेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. १३:-** देहू शहरातील विविध भागातील जीर्ण झालेली अनावश्यक सौचालय करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

**ठराव क्र.१३ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला .परदेशी बोळ, जुने ग्रामपंचायत शेजारील मुतारी या ठिकाणी जीर्ण झालेले मुतारी पाडण्यात यावे नवीन ठिकाणी बांधून जुने पाडण्यात यावे.ग्रामसेवक क्वाटर्स (कमानी शेजारील [redacted]) महिला व पुरुषासाठी प्रा आ केंद्र येथील मोडकळीस आलेली शौचालय पाडून नवीन सर्व मुलभूत सोईयुक्त अत्याधुनिक सौचालय बांधण्यात यावे अशा स्वरूपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ. सपना जयेश मोरे
अनुमोदक :- सौ पोर्णिमा विशाल परदेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. १४:-** चव्हाण नगर येथील चावडी समोरील जुनी पाण्याची टाकी पाडणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.१४ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील चावडी समोरील जुनी पाण्याची टाकी हि खूप जुनी झालेली असुन तीची पडझड झालेली आहे. तीचा कोणत्याही प्रकारे वापर होत नसुन सदरच्या टाकीमुळे एखादा अपघात घडू शकतो तेव्हा सदरची टाकी पाडणे खूप आवश्यक असल्याने सदरची टाकी पडून सपाटी करण करण्यात यावे व रिकाम्या झालेल्या संपूर्ण परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात यावे तसेच सदर ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेण्यात यावी अशा स्वरुपाची सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.ज्योती गोविंद टिळेकर

अनुमोदक :- सौ.प्रियंका अभिजित मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. १५:- देहूगाव बाजारआळी मधील वडाच्या झाडाचा ओटा दुरुस्तीबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१५ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक देव दर्शनासाठी येत असतात. तसेच देहू नगरपंचायत हद्दीतील बाजार आळी मधील मध्यवर्ती ठिकाणी वडाचे खूप मोठे जुने असुन त्याठिकाणी झाडाच्या कडेला ओटा बांधण्यात आलेला आहे. मोठ्या भेगा पडलेल्या आहेत त्यामुळे मंदिरात देवदर्शना साठी येणाऱ्या भाविकांना थोडावेळ विसावा म्हणून बसण्यासाठी त्याचा वापर होत असल्याने तो दुरुस्ती करण्यासाठी मंजुरी मिळावी.अशा स्वरुपाची सविस्तर चर्चा होऊन सदरच्या ओट्याची तुटफुट झालेली असल्याने या साठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवून ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ. सपना जयेश मोरे
अनुमोदक :- सौ. पोर्णिमा विशाल परदेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. १६:- देहू शहरात सार्वजनिक शौचालयाकरिता नवीन जागा उपलब्ध करून सौचालय बांधकाम करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१६ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक देव दर्शनासाठी येत असतात.

तसेच देहू हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने देहू येथे सार्वजनिक सौचालय बांधणे अतिशय गरजेचे आहे. सदर ठिकाणी नवीन जागा उपलब्ध करून सौचालय बांधकाम करणे तेव्हा सर्व प्रभागांचा सर्व्हे करून कोणत्या प्रभागात किती सौचालायाची आवश्यकता आहे याची सविस्तर पाहणी करून अहवाल तयार करण्यात यावा व त्यानुसार नविन सौचालय बांधण्यात यावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रवीण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. १७:- तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत शहरातील विविध भागात रस्त्याच्या कामाचे नियोजन करणेबाबत.

ठराव क्र.१७ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक देव दर्शनासाठी येत असतात. देहू शहरातील विविध भागातील देहू नगरपंचायत हद्दीतील नगरपंचायत मालकीचे जे रस्ते आहेत ते ग्रामपंचायत असताना बनविण्यात आलेले असुन ते खूपच खराब झालेले आहेत काही डांबरी रत्यावर खड्डे पडलेले आहेत. सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यांना तडे गेलेले असुन खड्डेही पडलेले आहेत.काही पेव्हिंग ब्लॉक चे रस्ते आहेत त्यांचे पेव्हिंग फुटून रस्तावर पडलेले आहेत ते बांधणे अतिशय गरजेचे आहे. तेव्हा सर्व प्रभागांचा सर्व्हे करून कोणत्या प्रभागात रस्त्याची आवश्यकता आहे याची सविस्तर पाहणी करून अहवाल तयार करण्यात यावा व त्यानुसार रस्ते सुधारित व नवीन बांधण्यात यावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे.

सुचक :- सौ.शितल अनिल हगवणे
अनुमोदक :- सौ.पुजा सुमित काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. १८:- देहू नगरपंचायत नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना शासकीय कामाकरिता वाहने भाडे तत्वावर पुरविणे बाबत.

ठराव क्र.१८ :- मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला देहू नगर पंचायत नवनिर्मित नगरपंचायत असल्यामुळे विविध विकास कामासाठी तसेच वेगवेगळ्या योजना राबवण्यासाठी सरकारी कार्यालयात जाने मंत्रालयात मुंबई जाने तसेच कलेक्टर ऑफिसला पुणे येथे जाने आवश्यक असते अश्या वेळी प्रवास करताना नगरपंचायतीचे स्वतःचे वाहन नसल्याने नगरअध्यक्ष व मुख्याधिकारी यांना शासकीय कामाकरिता भाडे तत्वावर वाहन देण्यात यावे व त्याचा वापर शासकीय कामासाठी बाहेर जाताना करण्यात यावा यासाठी गाडीवाल्याकडुन दरपत्रक मागून घेण्यात यावा अश्या स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.पूनम विशाल काळोखे

अनुमोदक :- सौ.पुजा सुमित काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. १९:- नगरसेवक तसेच नगरसेविका यांच्या निवास स्थान जवळ त्यांचा नावाचे फलक लावने बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला देहू नगरपंचायत हि नवनिर्मित नगरपंचायत असून सार्वत्रिक निवडणूक पार पाडून नवनिर्मित सदस्य निवडून आलेले आहे. त्यामुळे प्रत्येक प्रभागातील सदस्यांचा नावाचा फलक त्यांच्या निवास स्थानाजवळ लावण्यात यावा जेणेकरून प्रभागातील नागरिकांना त्यांच्या निवसस्थाने पोहोचण्यास अडचण येणार नाही. बाहेरून काही कारणास्त कोणी येणार असेल तर त्याला पण सदस्याच्या निवासस्थानी पोचण्यास अडचण येणार नाही. तेव्हा प्रत्येक सदस्यानच्या नावाचे फलक लवकरात लवकर लावण्यात यावे अश्या स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.प्रियंका अभिजित मोरे

अनुमोदक :- सौ.पुजा अमोल दिवटे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. २०:- देहू नगरपंचायतीचे नाव बदल करून श्रीक्षेत्र देहू नगरपंचायत असे करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

ठराव क्र.२०:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ग्रामपंचायतीचे शासन आदेशानुसार ८/१२/२०२० रोजी देहू नगरपंचायातीमध्ये रुपांतर झालेले असुन देहू हे महाराष्ट्रातील जगदगुरु संतश्रेष्ठ श्री संत तुकाराम महाराज यांचे पदस्पर्शाने पावन झालेले पवित्र भूमी असल्यामुळे सर्व सदस्यांनी एकमताने असे म्हणणे आहे कि, देहू नगरपंचायतीचे नाव **"श्री क्षेत्र देहू नगरपंचायत"** करावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- प्रविण रामदास काळोखे
अनुमोदक :- मयूर दत्तात्रय शिवशरण

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. २१:- सरकारी गायरान सर्व्हे नं.९७ मधील जागा शासकीय विभागाच्या मागणी नुसार वाटप बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.२१ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हि नवनिर्मित नगरपंचायत असून शाषण आदेशान्वये दि. ८/१२/२०२० रोजी देहू ग्रामपंचायतीचे देहू नगरपंचायत मध्ये रुपांतर झाले आहे. देहू नगरपंचायत हि नवनिर्मित असल्या मुळे ग्रामपंचायत असताना ग्रामपंचायतीने सरकारी गायरान सर्व्हे नं. ९७ मधील जागा बऱ्याच विभागांना वाटप केले आहे. त्यापैकीच पोलीस आयुक्तालयास ५० एकर जागा दिली होती त्यांचा मागणी प्रस्ताव नगरपंचायतीस प्राप्त झालेला आहे. परंतु नगरपंचायत हे नवनिर्मित नगरपंचायत असल्याने यापूर्वी ग्रामपंचायतिने जे सरकारी गायरानातील जागेचे वाटप केलेले आहे हे सर्व ठराव नामंजूर करण्यात येत असून कोणालाही सरकारी गायरानातील जागा द्यायची नाही.

नगरपंचायतीस सरकारी गायरान सर्व्हे नं. २ व ९७ या व्यतिरिक्त कोणतीही जागा नाही सर्व्हे नं. २ मध्ये यापूर्वी अतिक्रमणे झालेली आहे. त्यामुळे फक्त सर्व्हे नं. ९७ मधील जागा शिल्लक आहे. भविष्याचा विचार करता नगरपंचायतीस विकास कामे करण्यासाठी हीच जागा उपयोगी पडणार आहे. नगरपंचायतीची वाढती लोकसंख्या पाहता याठिकाणी पंपिंग हाउस, घनकचरा व्यवस्थापन,गार्डन, शॉपिंग कोम्प्लेक्ष, ग्रामीण रुग्णालय, वाहनतळ, नगरपंचायत कार्यालय,अग्निशामक कार्यालय, बाजार तळ, वइतर अनेक कामासाठी या जागेचा वापर होणार आहे. तसेच देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने वर्षातून तीन मोठ्या यात्रा भरत आहेत यात्रा कालावधीतील लाखो भाविक देव दर्शनासाठी येतात त्यांचा पण विचार करणे गरजेचे आहे. नगरपंचायतीस सरकारी गायराना व्यतिरिक्त कोणतीच मोकळी जागा नसल्याने या जागेचा वापर फक्त नगरपंचायतीच्या कामांसाठी करण्यात यावा.पोलीस आयुक्तालयास कोणत्याही प्रकारची जागा देऊ नये अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक :- श्री.आदित्य चिंतामण टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. २२ :-** देहू नगरपंचायत कार्यालयात पिण्याचा पाण्याची सोय करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.२२ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यालयात विविध कारणासाठी नागरिक येत असतात तसेच वरिष्ठ अधिकारी पण येत असतात सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने गरमाईचे प्रमाण खूप आहे त्यामुळे तहानेचे प्रमाणही खूपच आहे तेव्हा पिण्याचे पाण्याची सोय नगरपंचायत कार्यालयात R.O. फिल्टर लाऊन याद्वारे ग्रामस्थांना स्वच्छ व थंडगार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.पूजा अमोल दिवटे

अनुमोदक :- सौ. शितल अनिल हगवणे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २०.०४.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. २३:- भक्त निवास देहू येथील थकीत वीजबिल अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

